

# भोर नगरपरिषद कार्यालय भोर


**ता. भोर जि.पुणे . ४१२२०६**

फोन नं. ०२११३ २२७०४ Mail ID - bhormc@gmail.com


जा.क्र.बां.वि./30६५/२०१८

दिनांक - ६/१०/२०१८

परिशिष्ट आय

## इमारत वापराचा दाखला

प्रति,

१) स्वप्नलोक डेव्हलपर्स,
तर्फे भागीदार,
पंकज परमार, पुणे

२) संदीप हर्डीकर ॲन्ड
असोसिएटस,
शिवाजीनगर, पुणे

विषय :- भोर नगरपालिका हद्दीतील सि.स.नं. ५/३,५/४ व ३७/६ या जागेवरील बांधकामाचा इमारतीचा वापराचा परवाना मिळणेबाबत.

संदर्भ :- १.आपला दि. ३०/०७/२०१८ चा वापराचा दाखला मिळणेबाबतचा प्रस्ताव
२.आर्कीटेक्ट श्री. संदीप हर्डीकर यांचा दि. २१/०६/२०१८ चा पुर्णत्वाचा दाखला
३.भोर नगरपालिकेची दि. ३१/०५/२०१८ जा.क्र.१२०५/१८ ची बांधकाम नकाशे मंजुरी
४. मा. मुख्याधिकारी यांचेकडील जा.क्र./आस्था/२८१८/२०१८ दि.०८/०९/२०१८ चा आदेश

महाशय,

भोर नगरपालिका हद्दीतील सि.स.नं. ५/३,५/४ व ३७/६ या जागेवर आपणास भोर नगरपालिका कार्यालयाने संदर्भीय क्र. ३ नुसार दिलेल्या बांधकाम नकाशा मंजुरीनुसार आपण केलेल्या बांधकामाबाबत संदर्भीय क्र. २ नुसार आर्कीटेक्ट यांनी पुर्णत्वाच्या दाखल्यासह इकडील कार्यालयाकडे वापराचा दाखला मिळणेबाबत कळविलेले आहे त्या अनुषंगाने आपणास खालील अटीवर खाली नमुद केलेल्या अ.क्र. १ नुसारच्याच इमारतीचा वापर करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर इमारतीमधील खाली नमुद केलेलेच क्षेत्र वापराचा परवाना देण्यात येत आहे.
दि. ३१/०५/२०१८ रोजीच्या जा.क्र. बांध/१२०५/१८ नुसार नगरपालिकेने मंजुर केलेल्या नकाशातील इमारत क्र. ३४,३५,३६ यास याव्दारे वापर परवाना देणेत येत आहे.
२. मंजुर नकाशातील सामासिक अंतरे जागेवर कायमस्वरूपी सोडणे बंधनकारक आहे.
३. इमारत वापर परवानगी मिळालेनंतर बांधकामात नव्याने काही फेरबद्दल अथवा नवीन वाढु करू नये, अन्यथा सदरचे बदलास अनधिकृत समजणेत येऊन कायदेशिर कारवाईस पात्र रहाल.
४. सदरच्या प्रस्तावासोबत सादर केलेली कागदपत्रे खोटी अथवा दिशाभुल करणारी आढळुन आल्यास फौजदारी गुन्ह्यास पात्र रहाल

मुख्याधिकारी
भोर नगरपरिषद भोर